

# कृतीशील समाजशिक्षक

आजी-आजोबांकडून मिळालेले वात्सल्याचे, प्रेमाचे धडे; आईकडून मिळालेले सामाजिक बांधिलकीचे बाळकडू आणि डॉ. प्रकाश आमटे दाम्पत्याकडून सामाजिकतेची प्रेरणा घेत 'डीपर', 'सर फाऊंडेशन', 'साद माणुसकीची फाउंडेशन'चे संस्थापक आणि 'तुम्ही आम्ही पालक' मासिकाचे संपादक हरीश बुटले यांनी आजवर केलेली वाटचाल थक्क करणारी आहे. आयुष्यातील संकटांशी संघर्ष करत यशाची कास धरतानाच,'आधी केले, मग सांगितले' ही उक्ती बुटले सर आजवर प्राणपणाने जगले आहेत. आपले कुटुंब,आई-वडील, आपली शाळा, आपले आद्य गुरुजी, आपले गाव व समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सादग्राम, संपत्तीसहयोग ते संपत्तीदान, जगा आणि जागा: समृध्दीतून सहयोग, सेतूबंध : जागृत जाणीवांचा अशा अनेक उपक्रमांची कास धरत त्यांनी आपल्यातील कृतीशील समाजशिक्षकाचे दर्शन घडवले आहे. २० ऑगस्ट २०१८ रोजी वयाची पन्नाशीचा टप्पा पार केलेल्या बुटले सरांच्या कृतार्थ व प्रेरणादायी वाटचालीविषयी त्यांचेच मित्र सिस्कॉमचे अध्यक्ष श्री. राजेंद्र धारणकर यांनी घेतलेली प्रदीर्घ मुलाखत.

**१. आपले लहानपण कसे गेले?**

– चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यातील कोठारी हे माझे मूळ गाव. पहिली ते चौथी इयत्तेपर्यंतचे शिक्षण कोठारी गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. सर्वसाधारण परिस्थितीतील आमचे कुटुंब. मात्र, आजी–आजोबांमुळे संपूर्ण गावात कुटुंबाला एक वेगळा मान होता. माझे आजोबा श्री. बापूजी बुटले आणि आजी सौ. राधाबाई बुटले यांच्या अतिशय प्रेमळ आणि लाघवी स्वभावामुळे आमच्या कुटुंबाची जडणघडण सामाजिक दृकिा शिक्षणक्षेत्रात गावाबाहेर, त्यामुळे आपल्या घरातील शेती सांभाळण्यासाठी माझे वडील गावातच थांबले. आमच्याकडे आजोबांची ३६ एकर शेती, पैकी ३२ एकर कोरडवाहू; पण उत्तम पिकाची आणि ४ एकर भातशेती. लहानपणी या शेतीत मोठ्या प्रमाणावर उत्पन्न पाहिलेलं. मात्र, जशी समज यायला लागली, कळायला लागलं की, केवळ कोरडवाहू पद्धतीने केलेल्या शेतीतून दिवसेंदिवस कमी उत्पन्न होत आहे. आजोबांच्या काळात वडील निश्चिंत असायचे, कारण इतर सर्व काका आपल्या नोकरीनिमित्त गावाबाहेर असल्याने सगळी शेती त्यांनाच कसायला मिळायची. मात्र, वारंवारचे पीकबदल, हवामान, पुराचा फटका या सर्व प्रकारांत दिवसेंदिवस शेतीचं उत्पन्न कमी होत गेलं आणि खर्च वाढत गेले. मी त्या वेळी जेमतेम ७–८ वीत असेन. मला फारसं काही कळत जरी नसलं तरी अंदाज मात्र येत होता. आम्ही ७ भावंडं. सर्वांचं शिक्षण, लग्न आदी सर्व सुरळीत व्हायला शेतीचं उत्पन्न पुरेसं पडेल, असं चित्र नव्हतं.

माझे आजी–आजोबा खूप धोरणी होते. त्यांनी आपल्या मुलांवर एवढे चांगले संस्कार केले की, लहानपणी आमच्या कोठारीतील घरी आम्ही २० लहान भावंडं आणि आई–दादा, ३ काका–काकू व आजी–आजोबा अशा एकूण ३० जणांचे एकत्रित कुटुंब, उन्हाळ्याच्या सुट्टीचा आनंद घ्यायला एकत्र जमायचो. साधारणपणे ८ ते १० वर्षं आम्ही आमच्या गावात उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा निखळ आनंद घेतला. मात्र, ज्या वेळी माझ्या लक्षात आलं की, माझ्यापाठी ५ बहिणी आणि १ भाऊ आहे आणि शेतीतून फार काही निभेल, असं दिसत नाही, त्या वेळी शक्य तेवढ्या लवकर कमवायला सुरुवात करणे गरजेचे होते. वैद्यकीय आणि शिक्षणक्षेत्राची आवड होती आणि तशी अभ्यासात प्रगतीही. सतत मी जिल्ह्याच्या ठिकाणीही अव्वल असायचो. ४ थी व ७ वीची शिष्यवृत्तीही मिळाली. कोठारीच्या शाळेत टोंगे गुरुजींनी दिलेली शिकवण मला आजही गावी गेलो की, त्यांच्याकडे ओढून नेते. ते आता ७८ वर्षांचे आहेत. तरीही माझा विद्यार्थी हरीश कधी भेटायला येतो, याची ते वाट बघत असतात. वर्षातून २–३ वेळा गावाकडे जाणं होतं, त्या वेळी त्यांची भेट घेतल्याशिवाय पाय परत फिरत नाहीत. माझी सर्व भावंडे कोठारीच्याच जिल्हा परिषद शाळेत शिकली.



टोंगे गुरुजींसह कोठारी येथील प्राथमिक शाळेत.

**२. आपली शैक्षणिक कारकीर्द कशी होती?**

– चौथीपर्यंतचे शिक्षण कोठारीमध्ये झाल्यानंतर मी पुढील शिक्षणासाठी गजानन काकांकडे चंद्रपूरला गेलो. माझे काका त्यांच्या सासऱ्यांचे देवरावजी हजारे यांचे अतिशय लाडके जावई. त्यामुळे माझी काकू पुष्पाताई बुटले यांच्यासोबत मी चंद्रपूरला हजारे आजोबांच्या घरीच राहायचो. हजारे आजोबा कडक शिस्तीचे होते. माझी शाळा सकाळची असल्याने मला त्यांच्यासोबत सकाळी योगासनाच्या वर्गांना जायची इच्छा असूनही, जाता यायचे नाही. मात्र, त्यांच्या ग्रुपचे ज्या वेळी छोटे गेट–टुगेदर व्हायचे, त्या वेळी मी आवर्जून जायचो. आजोबांचे पूर्वी हलवायाचे दुकान होते, त्यामुळे आजी गयाबाई खूप छान स्वादिष्ट मिष्टान्ने बनवायची. तिच्या हातचा खाल्लेला कलाकंद मला आजवर उभ्या आयुष्यात खायला मिळालेला नाही. संध्याकाळी सर्वजण एकत्र जेवायचो. त्या वेळी टेबल मॅनर्स आणि लहानपणीच शिस्तीचे महत्त्वाचे धडे आजोबांकडून मिळायचे. माझे काका प्रा. गजानन बुटले हे अतिशय आज्ञाधारक आणि कर्तव्यदक्ष होते, त्यामुळे ते दोन्ही कुटुंबांतील लाडके होते. पाचवीपासून मी लोकमान्य टिळक विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवायचो आणि ती परंपरा मी बारावीपर्यंत जपली.

लहानपणापासूनच डॉक्टर व्हायचे स्वप्न पाहिले होते. मात्र, मला याही गोष्टीची जाणीव होती की, वैद्यकीय क्षेत्राचा लांबचा पल्ला मला परवडणारा नव्हता.

कारण, माझ्या मागे सहा भावंडे होती. दहावीपर्यंत घरातील आर्थिक परिस्थिती हळूहळू ढासळत चालली होती. शेतीचं उत्पन्न पूर्वीसारखं होत नव्हतं आणि दिवसेंदिवस खर्च वाढतच होता. त्यामुळे मला स्पष्ट कल्पना होती की, मी लवकरात लवकर नोकरीला लागून कुटुंबाचा आधार बनणे गरजेचे होते. दहावीनंतर मी नागपूरला प्रवेश घेईन, या उद्देशाने नागपुरातील सोमलवार, हडस आणि हिस्लॉप या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज केले. मात्र, मला अगदी अर्ध्या टक्क्याने माझा प्रवेश हुकला. त्यामुळे त्या काळातील आघाडीच्या आनंदवनच्या आनंद निकेतन महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. त्या वेळी आनंदवनात होणाऱ्या सामाजिक कार्याची पुसटशी कल्पनाही नव्हती. आनंद निकेतन महाविद्यालयासमोर ईबीसी वसतिगृहामध्ये मी प्रवेश




घेतला. (ते आता ज्ञानदा वसतिगृह म्हणून प्रा. मधुकर उपलेंचवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. त्यांना आपण नुकताच संस्थापालक सन्मान प्रदान केला.) अकरावीच्या वर्गाची आनंदात सुरुवात झाली. मात्र, तेव्हाच एक वाईट घटना घडली. माझा एक मित्र अविनाश गौरकर आणि मी एकाच सायकलवरून जात होतो, त्या वेळी अनावधानाने तो खाली पडला आणि त्याचा हात फ्रॅक्चर झाला. त्या घटनेने मी खूप व्यथित झालो. माझे मन तिथे रमेना म्हणून बल्लारपूरच्या गुरुनानक कनिष्ठ महाविद्यालयात मी प्रवेश घेतला, याच ठिकाणी माझी बौद्धिक आणि सांस्कृतिक जडणघडण झाली. याच ठिकाणी प्रा. विलासराव देशमुख, प्रा. अली, प्रा. पॉल, प्रा. बोंढे, प्रा. बोबडे व इतर सर्व शिक्षकांची खूप जवळीक निर्माण झाली. एकेका शिक्षकाच्या नावाने तिथे विभाग ओळखला जात होता. केवळ चंद्रपूर जिल्ह्यातच नव्हे, तर एकाच महाविद्यालयात सर्वाधिक डॉक्टरेट असणारे ते कॉलेज होते. अकरावीला मी प्रथम आलो आणि बारावीची तयारीही चांगली झालेली होती. माझा वैद्यकीय क्षेत्राकडील प्रवास आणि ध्येयपूर्ती फार दूर नव्हती. अशातच, ऐन बारावीच्या परीक्षेच्या वेळी माझी तब्येत बिघडली आणि पीसीएमचे पेपर दिल्यानंतर बायोलॉजीच्या पेपरच्या वेळी परीक्षेलाच जाता आले नाही. फिजिक्स, केमिस्ट्रीमध्ये चांगले गुण मिळूनही बायोलॉजीच्या पेपरला अनुपस्थित राहिल्याने एक वर्ष वाया गेले. माझ्या समोरची समस्या अशी की, ते वर्ष जुन्या अभ्यासक्रमाचे शेवटचे वर्ष. पुढील वर्षी बारावीची परीक्षा देताना नवीन अभ्यासक्रमाला सामोरे जावे लागले असते. त्यातच त्या वेळचे प्राचार्य पी. डी. इंगळे सरांनी मला प्रेमाने बोलावून सांगितले की, तुझ्यासारख्या हुशार विद्यार्थ्याला माझ्याच कॉलेजमधून पुन्हा परीक्षा द्यायला लावायला आवडेल. मात्र, माझ्या मते तू कॉलेज बदलावे, कारण तुला न्यूनगंड येऊ नये. त्याच वेळी आधीच 'वैद्यकीय'ची लांबपल्ल्याची वाट आणि वाया गेलेले वर्ष मला स्वस्थ बसू देत नव्हते. त्या वेळी कुटुंब आणि नातेवाईकांमधून माझ्या नापास होण्यावर प्रचंड ताशेरे ओढले जायचे. त्यात एक वेळ अशी आली की, मी आत्महत्येचा असफल प्रयत्नही केला. मात्र, त्या वेळी माझ्या आईने मला धीर दिला, त्यातून मी सावरलो. मात्र, कुटुंबातील आर्थिक स्थितीची जाण आल्याने चार वर्षांचे इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण करून कुटुंबाला हातभार लावणे हे साडेपाच वर्षांच्या वैद्यकीय शिक्षणापेक्षा जास्त सोयीचे वाटत होते, त्यामुळे मी चंद्रपुरात प्रवेश घ्यायचा निर्णय घेतला. चंद्रपुरात गेल्यानंतर नवीन अभ्यासक्रमाला सामोरे जायचे होते. बारावीत बायोलॉजी सोडून इलेक्ट्रॉनिक विषय घेतला. प्रा. अशोक मोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. माणिकराव अंधारे यांच्या रसायनशास्त्र विषयाचा मी गळ्यातील ताईत झालो होतो. कारण, अधीच्या वर्षी प्रा. व्ही. जी. देशमुख यांनी माझ्याकडून कसून तयारी करून घेतली होती. त्याचप्रमाणे, चौधरी सर (गणित), डोये सर (फिजिक्स) यांनी माझी तयारी करून घेताना अत्यल्प फी घेतली होती. अंधारे सरांनी तर मला नि:शुल्क शिकवले, त्या वेळी मी पुन्हा जिल्ह्यातून पहिला आलो आणि उत्तम गुणांनी ग्रुप स्कोअर केला. त्या वेळी प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुण्यातील (उजएझ) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश मिळाला.

**३. पुण्यातील आगमन आणि विद्यार्थी सहाय्यक समितीतील वास्तव्य हा प्रवास कसा झाला?**

एक सल कायमस्वरूपी होती की, मला डॉक्टर व्हायचे होते आणि आता केवळ पर्याय नाही म्हणून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणे गरजेचे होते. पुण्यात कॉलेजचे होस्टेल न मिळाल्याने विद्यार्थी सहाय्यक समितीत वास्तव्यास राहिलो. हे सर्व घडत असताना सतत विचार हाच यायचा की, जर काका समर्थपणे पाठीशी नसते तर शिक्षणाचं काय झालं असतं? पुण्यात शिकायला आलो आणि पंधरा दिवसांतच आजी

गेली. घरच्यांना एकत्रित बांधून ठेवणारा दुवा निखळला होता. मात्र, आजोबांच्या धोरणी स्वभावामुळे सर्वजण एका माळेत गुंफून होतेच. 'कमवा व शिका' या योजनेतून शिक्षण कसे करावे याचा स्तुत्य वस्तुपाठ म्हणजे विद्यार्थी सहाय्यक समिती. समितीच्या वास्तव्याच्या दरम्यान माझे पालक अभिनव अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक मनोहरराव आपटे सर हे होते. 'वैद्यकीय'ची आवड असल्याने मी इंजिनिअरिंगमध्ये फारसा रमलो नाही. केवळ कर्तव्य तेवढं पार पाडलं. मात्र मी जरी डॉक्टर होऊ शकलो नाही तरी माझी अर्धांगिनी रोहिणी पेशाने डॉक्टर आहे. तिने नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केलेले आहे.

**४. करीअरची आणि अर्थार्जनाची सुरुवात कशी झाली?**

– शिक्षण सुरू असताना पुण्यात मी अर्थार्जनासाठी कोचिंग क्लासेसमधून शिकवायचो. त्याच अनुभवातून पुढे 'श्रद्धा क्लासेस' नावाचा कोचिंग क्लास सुरू केला. राज्यभर त्याचा ४२ शाखांपर्यंत विस्तार झाला. एक सशक्त ब्रँड निर्माण केला. कोचिंगमधील फ्रँचाईसीची कल्पना महाराष्ट्रात पहिल्यांदा राबविली. देशातील पहिला ISO-९००२ कोचिंग क्लासपर्यंत ती मजल गेली. १२ वर्ष – एक तप त्या क्षेत्रात काढल्यावर लहान भावंडांचं शिक्षण, त्यांची लग्नं या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. माझ्या व्यवसायाने मला स्थिरता दिली. जबाबदाऱ्या पार पाडू दिल्या. पुण्यातील ऑफिस, घर या सर्व बाबी याच कालावधीत साकारता आले. या १२ वर्षांच्या वाटचालीत खूप चढ-उतार पाहिले. व्यवसाय करत असताना अनेक प्रकारच्या नाहक तडजोडी कराव्या लागत असल्याने मी फारच अस्वस्थ असायचो. क्लासेस क्षेत्रातील अनेक अनिष्ट गोष्टी मला पटत नसल्याने एका तपानंतर मी भरभराटीस असलेल्या कोचिंगला रामराम केला आणि चांगल्या वृत्तीच्या शिक्षकाला एकत्रित करून सर्वाधिक गुणवत्तेची 'डीपर' ही वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी प्रवेश पूर्व सराव परीक्षा सुरू केली. आज राज्यातील ती सर्वाधिक पसंतीची सरावपरीक्षा आहे. अर्थातच जे करायचे ते वेगळेपणाने करणे, हा माझा स्थायीभाव झाला होता. पुण्यात मी पूर्णपणे स्थिरावलो.

**५. डीपरची संकल्पना कशी रुजली?**

वैद्यकीय आणि अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी १२वीच्या गुणांपेक्षा Common Entrance Test (सीईटी) च्या गुणांना महत्त्व आल्यापासून शैक्षणिक क्षेत्रात अनेक संदर्भ बदलले. महाविद्यालयीन स्तरावर १२ वीचे महत्त्व कागदावरच राहिले. अभ्यासाचे सर्व लक्ष सीईटीवर केंद्रित होऊ लागले. सुरुवातीला विद्यार्थ्यांना हे सारे अवघड गेले. सीईटीला सामोरे जाण्याची मानसिकता तयार करणे हेच आव्हान ठरत होते. नेमकी हीच अडचण District Entrance Examination Performance Enhancement and Research (डीपर) ने लक्षात घेतली आणि सीईटीसाठी सराव परीक्षा (Mock Test) घेण्याचे प्रयोजन केले. त्याला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून आता उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. डीपर ही एक अशी परीक्षा पद्धती आहे की जी सीईटीविषयक समजूती आणि गैरसमजूती यावर दिशादर्शक म्हणून काम करते आहे . माझ्या शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवातून आणि कल्पकतेतून साकारलेली ही संकल्पना आता महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षणप्रेमिनी चालवलेली शैक्षणिक चळवळ ठरत आहे. या चळवळीत राज्यातील सुमारे ८०० महाविद्यालयातील जवळपास १५०० प्राध्यापकांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग आहे .

विद्यार्थी सीईटीबाबत फारसे गंभीर नसत. त्यामुळे त्याचा निकालावर परिणाम होऊन विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालेले असतानाच डीपरचा पर्याय समोर आल्याने साऱ्यांनी त्याला स्वीकारले. डीपरची कसौटी ही राज्य शासनाच्या सीईटीचे चित्र- अगदी परीक्षेचा फॉर्म भरण्यापासून तर अंतिम परीक्षेपर्यंत जसेच्या तसे आपल्यापुढे उभे करते. विद्यार्थी अपेक्षा ठेवून असतात, पण त्यासाठी सीईटीत आवश्यक असणारे गुण मिळवू शकत नव्हते, ही वस्तुस्थिती होती. याच काळात दिशाभूल करणाऱ्या जाहिराती होत्याच, त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील अस्वस्थता अधिकच वाढली.

सीईटीचे स्वरूप कसे असेल आणि त्याची तयारी कशा पद्धतीने करायची, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज होती आणि हेच काम नेमके डीपरने केले. राज्याच्या सीईटीला समांतर अशी तंतोतंत परीक्षा डीपरकडून आयोजिली जाऊ लागल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला आणि त्यातून



पन्नासाव्या वर्षाचे अभिष्टचिंतन करताना टीम डीपर.

अनेकांची स्वप्ने आकाराला आली ही वस्तुस्थिती आहे. दर्जा आणि नेमकेपणा या दोन गोष्टींमुळे डीपरचे कनिष्ठ महाविद्यालयांकडून मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्तपणे स्वागत झाले. डीपरची परीक्षा दिल्याने योग्य दिशेने अभ्यास केला जातो, सीईटीसाठी नेमके कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात ते समजू शकते आणि आपण कुठे आहोत त्याचे भान येते अशा प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी या डीपर च्या परीक्षेनंतर व्यक्त केल्या. परीक्षेची भीती निघून जाण्यात डीपरचा मोठा हातभार असल्याचेही अनेकांचे म्हणणे आहे . तीन तासात परीक्षेला कसे सामोरे जायचे याचे खरे तंत्र डीपरने विद्यार्थ्यांना शिकविल्याची प्रतिक्रिया शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत.

**६. डीपरचा पाया कसा घातला?**

डीपरला पहिल्या वर्षी म्हणजे २००७ मध्ये २९५७ विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. अर्थात त्या वर्षी केवळ एकाच म्हणजे पुणे जिल्ह्यात हा प्रयोग करण्यात आला. दुसऱ्याच वर्षी ६ जिल्ह्यांत चेलञ्ज ïशीिं घेण्यात आली, त्या वेळी ४२६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तिसऱ्या वर्षात १० जिल्ह्यांत, तर चौथ्या वर्षात २४ जिल्ह्यांत घेण्यात आलेल्या चेलञ्ज द्धशीिं ला अनुक्रमे १३ हजार ६११ आणि २० हजार ७०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. २०११ पासून सर्व म्हणजे ३५ जिल्ह्यात





डीपरची परीक्षा देताना विद्यार्थी.

(आता ३६ जिल्ह्यात) ही Mock Test घेण्यात येऊ लागली.

आतापर्यंत एकाच वर्षात सर्वाधिक विद्यार्थीसंख्या ३३०७६ पर्यंत पोहोचलेली आहे आणि १२ वर्षात मिळून जवळपास ३ लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या परीक्षेचा लाभ घेतला. यातूनच या परीक्षेची गुणवत्ता दिसून येते. विद्यार्थी आता ही परीक्षा सीईटीची/नीटची पूर्वपरीक्षा म्हणून देतात, त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो.

शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातूनही विद्यार्थी डीपरला चांगला प्रतिसाद देत आहेत. या परीक्षेसाठी आकारण्यात येणारे शुल्क आवाक्यात असल्याने कोणत्याही उत्पन्न गटात डीपरला आपलेसे केले जात आहे. सीईटीमुळे बारावीच्या परीक्षेकडे विद्यार्थ्यांचे लक्ष कमी असते. त्या परीक्षेला कमी लेखले जायचे, परंतु डीपरची सीईटी जानेवारीत होते. त्यामुळे विद्यार्थी लवकर तयारीला लागतात त्याचा फायदा बारावीच्या अभ्यासही झाल्याचे अनुभवाला येत आहे. त्यामुळे बारावी निकाल चांगला लागल्याने विद्यार्थ्यांना दुहेरी समाधान मिळत आहे.

मी लिहिलेल्या ‘सीईटीच्या उंबरठ्यावर’ या पुस्तकाला विद्यार्थी आणि पालकांकडून चांगलीच दाद मिळाली आहे. या पुस्तकाची नववी आवृत्ती प्रकाशित झाली असून आतापर्यंत एकूण १,५०,००० पेक्षा जास्त प्रतींचा टप्पा गाठलेला आहे.

अभियांत्रिकी आणि वैद्यकीयची सीईटी एक झाल्यापासून उत्तरपत्रिकेच्या स्वरूपात असलेली त्रुटी डीपरने लक्षात आणून दिल्यानंतर त्यात आवश्यक तो बदल झाला. माझ्या एका लेखातून ही बाब लेखातून सार्वजनिक केली. त्यानंतर लगेचच डीएमईआर आणि डीटीईकडून परिपत्रक काढण्यात आले आणि विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर झाला.

सुरुवातीला डीपरने चेलञ्ज द्धशीिं केवळ ३०० रुपयांत घेणे सुरू केले. त्यामुळे शासनाला दखल घ्यावी लागली. डीपरमुळेच शासनाने सीईटीचे शुल्क ९०० रुपयांवरून ७०० रुपये केले होते.

डीपरने शासनाला ११ वी आणि १२ वीसाठी एकच क्रमिक पुस्तक सुचविल्याने अनेक प्रकाशकांची पुस्तके घेण्याची गरज राहिली नाही. ग्रामीण भागातील मुलांना याचा फायदा झाला.

क्षमता नसतानाही आयआयटीसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना डीपरने वास्तवाचे भान दिले. त्यातून अनेकांच्या आयुष्याला निश्चित अशी दिशा मिळाली.

डीएमईआर आणि डीटीईकडून सर्वंकष

मेरिट लिस्ट लावली न जाण्याबद्दल याबाबत डीपरने विचारणा केली.

सीईटीसाठी सामायिक धोरण कसे असावे, याबाबत डीपरचे डअ–ऋएढख ळिपलळश्रिश संकल्पना मी मांडली आहे. यावर्षी छएएढ च्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर या संकल्पनेची खऱ्या अर्थाने चर्चा सुरू झाली. उशोपशींळीरींळेप झाल्यावर बँकांमध्ये रांगाच रांगा असल्याने अनेक विद्यार्थी परीक्षेचे पैसे भरायला बँकेत जावू शकले नाही आणि जीएसटी मुळे नाहक सर्वांना १८% चा वाढीव बोजा सहन करावा लागल्याने विद्यार्थी संख्येत थोडी घट झाली.



पहिला महापालक सन्मान २०१३ आमटे दाम्पत्याला प्रदान.

**७. तुम्ही–आम्ही पालक मासिक कसे सुरू झाले?**

– डीपर'मधून विद्यार्थी व शिक्षकांसाठी काम करत असताना 'पालक' हा घटक दुर्लक्षित राहिला होता आणि त्याचे प्रबोधन फार गरजेचे होते आणि अजूनही आहे. त्यासाठी काय करता येईल, या विचारात असतानाच आपल्या भारतात 'पालकदिन' साजरा होत नाही, याची जाणीव झाली. जुलैच्या ४ थ्या रविवारी 'आंतरराष्ट्रीय पालक दिवस' असतो, मात्र तो कधीही समारंभपूर्वक साजरा होत नव्हता. त्याचाच धागा धरून या दिवशी पालकांना जागृत करण्यासाठी काहीतरी करावं, असा विचार सुरू झाला. पालकत्वाची जाण वाढविण्यासाठी आणि पालकदिन साजरा करताना असामान्य कर्तृत्व असलेल्या पालक जोडप्याला 'महापालक' या सन्मानाने गौरवण्यात यावे, असा विचार झाला. त्याच वेळी पुन्हा असंही वाटून गेलं की, केवळ एक दिवस साजरा करून पालक प्रबोधन होणार नाही तर त्यासाठी एखादे 'मासिक' काढावे. त्यातूनच 'तुम्ही–आम्ही पालक' या मासिकाचा जन्म झाला आणि आता या मासिकाने पाचवा वर्धापन दिवस साजरा करून ६ व्या वर्षांत दमदार पदार्पण केले आहे. कोणतीही जाहिरात नसलेले, रंगीत असे हे मासिक समाजाला समर्पित आहे आणि त्यातून मिळणारा नफा केवळ सामाजिक कार्यासाठीच वापरला जातो.

**८. महापालक सन्मानाच्या अटी काय आहेत?**

– २५ वर्षांचं सहजीवन जगत असताना स्वतःपलीकडे जाऊन इतरांना पालकत्वाची उब देणारे जोडपे, अशा या सन्मानाच्या प्रमुख अटी आहेत. पहिल्या सन्मानासाठी अर्थातच फार विचार करावा लागलाच नाही. महामानव बाबा आमटे यांच्या कुटुंबाचा विचार येताच डॉ. प्रकाश व डॉ. मंदाताई आमटे या जोडप्याचे नाव अग्रस्थानी होते. मी त्यांना १२ वर्षांपूर्वी माझ्या आदरणीय विजय मार्कंडेवार सरांसोबत भेटलो होतो. त्यानंतर माझी भेट झालेली नव्हती. त्यांच्याकडे हा विचार घेऊन गेल्यानंतर त्यांनी या कल्पनेचे स्वागत केले आणि पहिला 'महापालक' सन्मान स्वीकारण्याचे कबूल केले आणि तेथेच या सन्मानाची वाटचाल चांगली होईल, याविषयीची जाणीव निर्माण झाली. पहिला महापालक सन्मान सोहळा पुण्यात फार उत्साहात साजरा झाला. राज्याचे तत्कालीन सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे उपस्थित होते. पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते तो प्रदान करण्यात आला.

**९. महापालक सन्मान निवडीसाठी निवड समिती आहे का?**

– 'महापालक' निवडीसाठी निवड समिती असण्याचा प्रश्नच नव्हता. तो मान आम्ही महापालकांनाच बहाल केला आहे आणि दुसऱ्या वर्षीच्या महापालकाचा शोध सुरू झाला त्यावेळी आदरणीय प्रकाशकाका आणि मंदाकाकूंनी मला विचारलं, 'तुझ्या डोक्यात कोणी आहे का?' महापालक निवडणे हा त्यांचाच अधिकार असल्याने साहजिकच मी त्या प्रक्रियेची केवळ चर्चा केली मात्र, निवडीसंदर्भात सर्व अधिकार त्यांच्याकडेच दिले आणि आजही तीच प्रथा आहे.

**१०. निवडप्रक्रियेतील एखादी आठवण सांगाल का?**

– दुसऱ्या महापालक निवडीच्या वेळी प्रकाशकाकांनी मला एका नामवंत दांपत्याकडे पाठविले. मी त्याच दिवशी त्या दांपत्याची भेट घेण्यासाठी रवाना झालो. अंधार पडायच्या आतच पोहोचलो होतो. मात्र, सामाजिक क्षेत्रात असूनही अपॉइंटमेंटशिवाय भेटत नसल्याने दुसऱ्या दिवशी त्यांनी

बोलावले. ठरल्याप्रमाणे सकाळीच मी व माझ्या भावाचे सासरे भेटायला गेलो. त्यांना संस्थेविषयी आणि 'महापालक सन्मान' प्रक्रियेविषयी सर्व माहिती दिली. संस्थेविषयीची माहिती देताना 'डीपर', 'सर फाउंडेशन' आणि 'तुम्ही-आम्ही पालक' मासिकाविषयी सांगितले. मासिकाचे पहिल्या वर्षाचे ७-८ अंक दिले. सर्व माहिती देताना ते फार सकारात्मक होते. अंकाविषयी त्यांनी प्रथमदर्शनी चांगली टिपण्णीही केली. सर्व चर्चा झाल्यावर त्यांनी त्यांचं एक पुस्तकही मला सप्रेम भेट दिलं आणि 'तुम्हाला कळवितो,' असं सांगून मला रवाना केलं.

त्यांनी सांगितल्याप्रमाणे ४-५ दिवसांनी मी ठरलेल्या दिवशी फोन केला आणि फोनवरचे संभाषण ऐकून आपण त्याच व्यक्तीला भेटून आलो का, असा संभ्रम व्हावा इतकं असंबद्ध ते बोलले. त्यापैकी त्यांनी काढलेला निष्कर्ष म्हणजे एक मोठाच जावईशोध होता, असं लक्षात येत होतं. मात्र इतक्या उंचीची जनमान्य, सर्वमान्य व्यक्ती इतक्या खालच्या स्तरावर उतरू शकेल याची मला सुतराम कल्पनाही नव्हती. स्वतःला गांधीवादी आणि सर्वोदयी समजणारी व्यक्ती असे निष्कर्ष काढू शकेल, याचेच आश्चर्य वाटले.

व त्यांच्या म्हणण्यानुसार

१) 'डीपर' ही नफा मिळविणारी व्यावसायिक संस्था आहे.

२) 'डीपर'मुळे स्पर्धेला प्रोत्साहन मिळते आणि कोणत्याही स्पर्धात्मक बाबी त्यांना आवडत नाहीत.

३) अशा व्यासपीठावर ते पुरस्कार स्वीकारत नसल्याने त्यांना आमचा सन्मान स्वीकारता येणार नाही.

माझ्यासाठी त्यांचे हे विचार म्हणजे आधीच म्हटल्याप्रमाणे जावईशोधच होते, कारण 'डीपर'च्या वाटचालीत नफा हा कधीच केंद्रस्थानी नव्हता. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत पुढे आणणे हा एकमेव उद्देश ठेवून अतिशय अल्पशा फी मध्ये सराव परीक्षा घेणारी महाराष्ट्रातील सर्वाधिक पसंतीची 'डीपर' ही संस्था. मनात आणलं असतं आम्ही तर चांगल्या प्रमाणावर संस्थेसाठी अॅसेट करू शकलो असतो. मात्र ते न करताही आम्ही व्यावसायिक ! तरीपण एवढ्या मोठ्या उंचीच्या व्यक्तीने असे संबोधले आहेच तर त्यात काही त्यांचा विचार असेल असं वाटून त्यांना मी प्रतिप्रश्न केला.

''आपली 'डीपर' संस्थेबाबतची निरीक्षणे अशी का? त्याचं जरा स्पष्टीकरण दिलंत तर माझं काही चुकत असल्यास मला दुरुस्ती करता येईल.''

त्यांनी उत्तर दिलं. ''माझं ते निरीक्षण आहे, स्पष्टीकरणाची गरज नाही. मला आपला सन्मान स्वीकारता येणार नाही.'' आता मात्र मी अस्वस्थ झालो होतो. तरीपण व्यक्ती मोठी असल्यामुळे मी पुन्हा त्यांना त्यांच्याच माहितीतील एक उदाहरण दिलं आणि म्हणालो, 'साहेब, ज्या व्यक्तीशी आपली संस्था मिळून काम करते ती संस्था केवळ महाराष्ट्रव्यापीच नव्हे तर देशपातळीवर, विदेशांतही होणाऱ्या उएढ परीक्षांच्या निकालाची कामे करून देतात. मी त्यांना त्या संस्थेच्या आणि संबंधित व्यक्तींच्या नावानिशी संदर्भ दिल्याने त्यांची फार मोठी पंचाईत झाली आणि आपला दुपट्टीपणा हरीशच्या लक्षात आला, असं समजताच त्यांच्या बोलण्याचा पारा वाढला आणि ते म्हणाले, 'हे बघा आमचं काय ते आम्ही बघू, मात्र मला अशा परीक्षांना प्रोत्साहन द्यायचे नाही त्यामुळे आपल्या व्यासपीठावर येता येणार नाही.'

त्यावर मी म्हणालो, 'आम्ही आपणास पालकत्वाचा महापालक सन्मान स्वीकारण्यास विनंती करत आहोत ना की आमच्या परीक्षांचे मार्केटिंग.'

आता मात्र चर्चा टिपेला पोहोचली होती. वरील निर्देशित संबंधित ज्या व्यक्तींशी त्यांचा सामाजिक कार्यात सलोखा होता त्यांचे व माझे चांगले स्नेहाचे संबंध. ते 'डीपर'च्या एका कार्यक्रमात येऊन 'डीपर'विषयक भरभरून बोलून गेले होते. आणि 'डीपर'ने केलेल्या कामाविषयी त्यांच्या भाषणात गौरवोद्गार काढले. या साऱ्या बाबी मी माझ्या वैयक्तिक भेटीत त्यांना सांगितल्या होत्याच तरीही संस्थेविषयीचं त्यांचं मत ऐकून आश्चर्य वाटत होतं मात्र नम्रतेने त्यांना पुन्हा विचारणा केली.

* साहेब, आपण आमच्या संस्थेविषयी नीट माहिती घेतली का? मागील ७ वर्षांची वाटचाल समजून घेतली का?
* आपण ज्या स्पर्धेविषयी बोलत आहात, ती या स्वरूपात नाही केली तर २ लाख विद्यार्थ्यांतून २०६० (त्या वेळेसचा चइइड चा सरकारी आकडा) जागांवरचे प्रवेश देण्यासाठी काही पर्यायी तंत्र आहे का?
* राज्य शासनाच्या फी पेक्षा कमी फीमध्ये कितीतरी जास्त प्रमाणात साहित्य आणि त्या तोडीच्या २ सराव परीक्षा व इतर सेवा आमच्याकडून विनाखंड दिल्या जात आहेत. निकालाचे सारे मापदंड या परीक्षेने सर केले व शासनाची परीक्षा पारदर्शी केली तर अशी परीक्षा 'व्यावसायिक' कशी?

आता त्यांचा संयम संपत आलेला होता. त्यांनी मला स्पष्ट शब्दांत सांगितले की, त्यांना या सन्मानामध्ये रुची नाही.

त्यांनी मांडलेले Logic कस चुकीचं आहे, ते सिध्द होत असल्याने त्यांना हे कधीही न विसरणारे असं संभाषण माझ्याशी करावे लागले. आमची संस्था ही व्यावसायिक आहे, तिचा सामाजिक हेतू नाही आणि तुम्ही स्वतः कधीही स्पर्धेला वाव दिला नाही किंवा अशा व्यासपीठावरून सन्मान घेतलेच नाहीत का? जोपर्यंत माझ्या या प्रश्नांची उत्तरं मला मिळत नाहीत तोपर्यंत मी आपल्याकडे पाठपुरावा करेन, असं सांगून मी फोन ठेवला.

आता मात्र माझ्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. आपल्याच भागातील एक तरुण धडाडीने हे असं चांगलं काम करत आहे, त्याविषयीची पालकत्वाची भावना तर दूरच राहिली, उलटपक्षी दुहेरी मापदंड वापरून चूक असतानाही आपलंच मत कसं योग्य, असे वारंवार बिंबवणारे सद्गृहस्थ कमालीचे बुद्धिवंत, सर्वज्ञात आणि नामवंत सामाजिक कार्यकर्ते असले तरी 'महापालक सन्मान' देण्यासाठी खरंच योग्य आहेत

का? असा विचार मनात दाटून आला. पालकत्वाची भावना जाणणारी व्यक्ती अजाणतेपणेही कोणाचे मन दुखवणार नाही. मात्र, या व्यक्तीने नेटाने आपली बाजू चूक असूनही पुढे दामटली. त्याच क्षणाला माझ्या जीवनातील पुढील मोठ्या अध्यायाला सुरुवात झाली. माझ्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला तो म्हणजे सामाजिक संस्था आणि कार्यकर्ते हे खरेच योग्य हेतूने कार्य करत आहेत का? आणि मग सुरु झाला पुढचा प्रवास.

मला माझ्या वाटचालीची आणि हेतूची स्पष्ट कल्पना असल्याने मी कोणती वाट चोखाळतोय याची पूर्ण आणि स्पष्ट जाणीव होतीच. मात्र सामाजिक क्षेत्रात एवढं मोठं नाव आणि मानसन्मान मिळालेली व्यक्ती अशा विचाराची असू शकते, यावर विश्वासच बसत नव्हता. आता मला खात्री पटली होती की, स्वतःच्या मेहनतीचे आणि अनेक पालकांच्या वर्गणीतून जमलेली १ लाखाची रक्कम निदान 'पालकत्व' या विषयासाठी तरी या व्यक्तीला देणे उचित नाही, त्यावर मी शिक्कामोर्तब केलं.


तुम्ही-आम्ही पालकच्या पन्नासाव्या अंकाचे प्रकाशन.

**११. तुम्ही-आम्ही पालक मासिक समाजाला समर्पित करण्याचा निर्णय कधी झाला?**

– 'तुम्ही-आम्ही पालक' मासिक सुरू करण्यामागची भूमिका मी वेळोवेळी स्पष्ट केलेलीच आहे. मात्र, या मासिकाचं आजचं दर्जेदार रूप कसं निर्माण झालं, यामागचं वास्तव जाणाल, तर आपणास प्रश्न पडेल की खरंच असंही घडू शकतं का! या मासिकाची निर्मिती करताना कार्यकारी संपादनाची जबाबदारी सामाजिक भान जपलेल्या एका मोठ्या दैनिकाच्या माजी संपादकांकडे सोपविली होती. या दरम्यान त्यांनाही काही आर्थिक विवंचना होत्या. त्यासाठी पुढील २ वर्षाच्या अंकाच्या निर्मितीचे आगाऊ मानधन देण्यासाठी मी माझा स्वतःचा फ्लॅट गहाण ठेवून बँकेतून कॅश क्रेडिट काढून देण्याची तयारी दाखविली. मात्र, त्यांना त्या संदर्भातील करार करायचा नव्हता. बँकेची कागदपत्रे तयार करताना थोडा विलंब झाला होता. त्यामुळे त्यांना ३ महिन्यांचे आगाऊ पैसेही देऊन झाले होते. मला माझ्या व्यवसायाचा एक भाग म्हणून मासिक काढायचे होते. त्या वेळी ते समाजाला समर्पित करण्याचा कोणताही इरादा नव्हता. मात्र ज्यावेळी माझ्या लक्षात आलं की ते करारनामा करायला तयार नाहीत आणि मासिकासाठी मला ज्या पद्धतीने वाटचाल हवी तसे लेख दिसत नाहीत. त्याचवेळी पहिल्या २ महिन्यांतच त्यांनी जबाबदारी सोडली. त्यानंतर त्यांच्याच सहकाऱ्याने जवळपास ३०% रक्कम प्रती अंक कमी करत पुढील ३ महिने काम पाहिले. ऑगस्ट, सप्टेंबरनंतरचा दिवाळी अंक आणि डिसेंबरचा अंक त्यांच्या अखत्यारीत झाला. जानेवारीच्या अंकातील आशयामुळे पुन्हा एकदा मला माझ्या मनातला अंक तयार होताना दिसत नव्हता. मी स्वतःच्या पातळीवर तो अंक ३१ डिसेंबरला पूर्ण करून प्रिंटिंगला पाठवला. डीएडची परीक्षा ५ जानेवारीला असल्याने उर्वरित ३-४ सेंटरचे पेपर्स घेऊन रात्री बुलढाण्याकडे रवाना झालो. मला तेथील शारदा ज्यु. कॉलेजने त्यांच्या स्नेहसंमेलनासाठी पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलवले होते. मात्र, माझ्यासमोर फार मोठं संकट येणार, याची कल्पनाही नव्हती. खामगाव सेंटरचे साहित्य देऊन गजानन महाराजांच्या दर्शनाला गेलो आणि परतताना माझ्या डस्टर या वाहनाला फार मोठा अपघात झाला. त्यात गाडीच्या पुढील भागाचा पूर्ण चक्काचूर झाला. नशीब बलवत्तर म्हणून वाचलो आम्ही! मला थोडंच लागलं मात्र, माझा मित्र २ वर्षानंतर चालू लागला. या अपघाताविषयीची सविस्तर माहिती फ ेब्रुवारी आणि मार्च २०१४ या अंकात 'एक अपघात शिकवणारा'मध्ये दिलेली आहे. तो शक्य झाल्यास जरूर वाचा. या अपघाताने मला खूप काही शिकवले व जीवनाचा अर्थ समजावून सांगितला. आमच्या गाडीला धडक मारणारा दहावीत शिकणारा एक विद्यार्थी होता. ज्या 'पालकत्वाची कार्यशाळा' घ्यायला मी निघालो होतो तिच्या मुळावरच तो घाव होता. अपघातानंतर जवळचे मित्र कसे वागतात, त्याचाही अनुभव मिळाला. सर्वात चमत्कारिक म्हणजे या मासिकाची संपादकीय जबाबदारी सांभाळणारे गृहस्थ तेथून तब्बल वर्षभर मला भेटलेच नाहीत. ना त्यांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केली ना, या अंकाची काळजी! ते थेट मला पुढील वर्षी १ जानेवारी २०१५ ला एका कार्यक्रमातच भेटले.

या सर्व घडामोडींमुळे मला अंकाची जबाबदारी पूर्णपणे आपल्या हातात घ्यावी लागली. आपण सारे साक्षी

आहात, की हा अंक दिवसेंदिवस खुलतच चालला आहे. माझ्या जीवनातील घडणाऱ्या काही घटना मला एक नवीन मार्ग शोधून देत होत्या. १ जानेवारी २०१४ ला एक प्रकारचे जीवनदानच मिळाले होते आणि त्याचवेळी मी ठरवलं, की आपलं उर्वरित आयुष्य समाजासाठी काहीतरी भरीव करण्यात घालवायचं. दुसऱ्या महापालकाच्या निवडीच्या वेळी घडलेली सत्यकथा आपण वाचलीच आहे. तेथून सामाजिक क्षेत्रात काहीतरी भरीव योगदान देता येईल, अशी मनाशी खूणगाठ बांधली आणि त्यामुळे 'तुम्ही-आम्ही पालक' हे मासिक समाजाला समर्पित करण्याचा निर्णय त्याच वर्षी डिसेंबरमध्ये महामानव बाबा आमटेंच्या जन्मशताब्दीदिवशी त्यांच्या जीवनावर आधारित विशेषांक काढून पुढील जीवनाच्या वाटचालीबद्दल निर्णय घेतला.

**१२. 'साद माणुसकीची' अभियानाचा पाया कसा घातला?**

– सामाजिक क्षेत्रात जे दिसेल त्यातून मनात सातत्याने अनेक मूळ प्रश्नांचे काहूर माजत होते. गावाकडील इतर लोकांची आर्थिक स्थिती आणि जीवनमानाचा दर्जा कधी उंचावेल, याचाही विचार करत बसायचो. माझ्या मनाशी मला प्रश्न पडायचे की, जर मी लवकर कमवता झालो नसतो तर..? माझ्या आई-वडिलांनी त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या कशा पार पाडल्या असत्या? आम्ही भावंडे आज ज्या स्थितीत आहोत, ते राहू शकलो असतो का? आमचे आजोबा ९८ व्या वर्षी गेले. रामनवमी १९९५ ला पुण्यातील माझ्या ऑफिसची त्यांच्या हातूनच फीत कापली. त्या वेळी ते ९५ वर्षांचे होते, तेव्हा त्यांनी पर्वती सहजपणे चढलेली होती. ते असतानाच सर्व काकांची शेती प्रत्येकी ८ एकर त्यांना दिली व आई-दादांकडे ४ एकर जादा सुपूर्द केली. आज ती १२ एकर शेती वर्षभराचे नीट उत्पन्न काढू शकत नाही तर ज्यांच्याकडे २/३/५ एकर जमिनी आहेत, ते कोरडवाहू



टोंगे गुरुजींना ७५ वर्षानिमित्त ७५ हजारांचा धनादेश देताना.

शेतकरी संसार कसा करत असतील? याचा मोठा प्रश्न डोळ्यांसमोर उभा ठाकत असे. यातूनच गाव-खेड्यांसाठी काहीतरी केले पाहिजे, हे विचार घोळत असत. मात्र, निश्चित दिशा सापडत नव्हती. गावाकडे जाणे-येणे सुरू असताना गावाकडील एकेका प्रश्नाची धग जाणवायला लागली. गावच्या शाळेत ज्या वेळी गेलो, त्या वेळी तेथील सुविधांची स्थिती जेमतेम होती. टॉयलेट्सची स्थिती फारच गंभीर होती. तिथे उभं राहणंही शक्य होत नव्हतं. कसे विद्यार्थी त्याचा वापर करत असतील? गावात माध्यमिक शाळा आहे. तेथीलही अवस्था अशीच. मुलींच्या गळतीचं प्रमाण का जास्त आहे, त्याची जाणीव त्या ठिकाणी झाली. आपल्या परीने जे शक्य आहे ते गावासाठी करायला पाहिजे, हा विचार पक्का झाला. गावाच्या शाळेला प्रोजेक्टर देऊन शाळा डिजिटल करण्याचा पहिला प्रयत्न झाला. साद माणुसकीची अभियान शिक्षकांसाठी सुरू झालेलंच होतं. शिक्षकांच्या मूल्यवर्धनासाठी कार्य करण्याचा मानस होता आणि केवळ 'शिक्षण' या विषयावर भर देत वाटचाल सुरू केली. मात्र, जसजसे पुढे जात गेलो, त्या वेळी 'ग्रामविकास' साधायचा असेल तर शेतीशिवाय तो पूर्णच होऊ शकत नाही, हे लक्षात आल्यावर शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास, शेती व वृद्धसेवा या पंचसूत्रीवर कार्य करण्याची गरज असल्याचे लक्षात आले आणि त्यानुरूप सारासार विचार करून एखादं गाव समृद्ध करायचं तर काय केलं पाहिजे, यावर विचार सुरू झाला.

**१३. 'साद माणुसकीची' संकल्पना काय आहे?**

– असं म्हणतात की, आपला भारत खेड्यांत राहतो. खेड्यात वाढतो, फुलतो; पण गेल्या काही वर्षांत हे चित्र बदलू पाहतंय. वाढत्या शहरीकरणाच्या रेट्यात खेडी आपलं स्वत्व, आपली अस्मिता गमावत आहेत की काय, असा प्रश्न निर्माण होतो. शहरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी, शिक्षणाच्या सोयी-सुविधा, पाश्चात्त्य विचारांची व आधुनिकीकरणाची भुरळ या व अशा अनेक कारणांमुळे खेड्यांतून शहरांकडे होणारे विस्थापन आणि ओस पडणारी खेडी ही एक चिंतेची बाब बनली आहे. या समस्येवर मात करायची असेल तर खेड्यात राहणारा भारत समजून घ्यायला हवा. खेडी समजून घ्यायला हवीत आणि भारताचा विकास साधायचा असेल तर खेडी विकसित व्हायला हवीत. शिक्षण हा कोणत्याही विकासाचा पाया मानला गेला आहे. विकासाच्या सर्व संकल्पना या प्रभावी शिक्षणाभोवती गुंफल्या गेल्या आहेत म्हणूनच खेड्यांचा विकास साधायचा असेल तर खेड्यात उपलब्ध सोयी-सुविधा सक्षम करणे गरजेचे आहे. ग्रामविकासाचे हेच ध्येय व उद्दिष्ट समोर ठेवून 'साद माणुसकीची फाउंडेशन'ची स्थापना करण्यात आली आहे.

समृद्धजनांच्या सहभागातून स्वयंप्रेरित,

सातत्यपूर्ण, सर्वांगीण व शाश्वत ग्रामविकास करणे, लोकसहभागातून ग्रामविकासासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, लोकसहभागासोबत अनिवासी ग्रामवासी, ग्रामस्थ, उद्योजक व सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ग्रामविकासासाठी दिशादर्शन करणे, ग्रामविकासाच्या संकल्पनेला समर्पित सेवाभावी कार्यकर्त्यांची फळी उभी करून त्यांचे प्रशिक्षण व कियान्वयन करणे, दानशूर व्यक्ती/संस्था/ उद्योग, गरजू गावं व सामाजिक संस्था यांच्यामधील एक विश्वासार्ह सेतू म्हणून स्वतःला स्थापित करणे, समाजाचे प्रयत्न व त्याचा सकारात्मक परिणाम यांची योग्य माहिती सर्व हितधारकांपर्यंत पोचवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पारदर्शी माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे, ही संकल्पनेमागील उद्दिष्टे आहेत.

**१४. 'आधी केले, मग सांगितले' हे ब्रीदवाक्य आपण कायम अवलंबिले आहे. त्याबाबत काय सांगाल?**

– मागील वर्षी कोठारी पंचक्रोशीतील १० गावांच्या जिल्हा परिषद शाळांना त्यांनी मागेल त्या भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या, त्यासाठी मी स्वतः पुढाकार घेऊन दरवर्षी १ लाख असे ५ लाख रुपये देण्याचे ठरविले आणि त्या प्रकल्पासाठी विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्टच्या माध्यमातून २० लाख रुपयांची देणगी मिळवून दिली. या रकमेतून सर्व १० शाळांमधील भौतिक सुविधांचा संपूर्ण कायापालट झाला. आता या १० शाळांमधील शौचालये अतिशय स्वच्छ झाली आहेत, त्याच प्रमाणे प्रत्येक शाळेला स्मार्ट टी.व्ही., पाणी शुद्धीकरण यंत्रे, वॉटर कुलर, सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य, लायब्ररीसाठी पुस्तके आणि कपाट, झअ सिस्टीम, संगणक, प्रिंटर, पंखा आणि शौचालय स्वच्छतेसाठी भरपूर सॅनिटरीचे साहित्य अशा साहित्याचे वाटप करून त्याचे लोकार्पण मागील वर्षी ३० मार्च २०१७ रोजी महापालक डॉ. रवींद्र कोल्हे यांच्या उपस्थितीत केले होते. या वर्षी या सुविधांच्या वर्षपूर्तीनिमित्त कोठारी पंचक्रोशीतील गावकऱ्यांसाठी आरोग्य निदान शिबिर, रक्तदान शिबिर, शिक्षक–प्रशिक्षक, युवा संवाद, शेतकरी संवाद, सार्वजनिक वाचनालय आणि डिजिटल लायब्ररीच्या उद्घाटनाचे कार्यक्रम झाले.

**१५. कोठारी गावातील कार्यक्रमांच्या आयोजनातून आपणांस कोणत्या ठळक बाबी लक्षात आल्या?**

– २९ मार्च रोजी साधारणपणे ५५० आबालवृद्धांनी आरोग्य तपासणी केली. या आयोजनातून गावातील आरोग्यविषयक समस्या समजून आल्या. युवा संवादातून युवकांचे प्रश्न किती जटील आहेत, त्याची कल्पना आली. मात्र, तत्पूर्वी हेच युवक आणि शेतकरी कार्यक्रमाच्या ठिकाणी साधारणपणे १।। ते २ तास उशिरा पोहोचत होते. त्यांना त्या संदर्भात विचारणा केली असता, गावाकडे कोणतेही कार्यक्रम असेच उशिरा सुरू होतात, कारण जे काही थोडेबहुत कार्यक्रम होतात ते राजकीय पुढाऱ्यांचे आणि त्यातही पुढारी दिलेल्या वेळात कधी पोहोचतच नाहीत. त्याचप्रमाणे कार्यक्रमस्थळी वाहून नेणे, काहीतरी गोड किंवा तिखटाचं जेवणे देणे, मोफत काहीतरी वितरण असलं की गावकरी गर्दी करतात. मात्र, शेतकरी संवादाच्यावेळी दुपारी ३ वाजून गेल्यानंतरही ग्रामस्थ जागचे हलत नव्हते, त्या वेळी उन्हामुळे कोणाला त्रास होऊ नये म्हणून आम्ही त्यांना विचारणा केली, त्या वेळी त्यांनी वरील व्यथा बोलून दाखविली आणि असे मार्गदर्शन आम्हाला आजपर्यंत लाभले नाही, याची प्रांजळ कबुली दिली. गावाकडे राजकीय मंडळींनी पाडलेला पगडा ही फार मोठी चिंतेची बाब आहे. त्यामुळे एखाद्या पक्षाच्या मोठ्या कार्यक्रमाला जी गर्दी जमते, ती त्या पक्षाची असतेच असे नाही, तो केवळ एक मोठा ग्रामीण जनतेच्या भावनेशी खेळ असतो आणि हा खेळ राजकारणी दिवसेंदिवस खेळत आलेले आहेत.

ग्रामीण विकास करताना शेती आणि शेतीशी निगडित सर्व समस्या फार मोठ्या प्रमाणावर आहेत, त्यासाठी गटशेती हा महत्त्वाचा उपाय आहे. बांधावरची भांडणं जोपर्यंत संपत नाहीत तोपर्यंत गटशेती ही केवळ दिवास्वप्नच ठरते. बहुतांशी शेतकऱ्यांकडे ५ एकरपेक्षा जास्त जमीन नाही, त्यामुळे त्या जमिनीतून उदरनिर्वाहासाठी कोणतीही आधुनिक पद्धत न वापरता उत्पन्न मिळवणे जिकिरीचे होऊन बसले आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरणे गरजेचे आहे.

कोठारी हे गाव साधारण साडेसात हजार लोकसंख्येचे गाव आहे. मात्र, या गावात एकही ग्रंथालय आणि वाचनालयाची सुविधा नव्हती. माझ्या एका भेटीत ही समस्या सोडविण्यासाठी काही तरुणांनी पुढाकार घेतला. सुविधा वर्षपूर्तीच्या या कार्यक्रमाच्या वेळी एका सुसज्ज वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

हे काम कोठारी गावाशी कधीही संबंध न आलेल्या व्यक्ती आणि संस्थांनी केले. केवळ कोठारी गावचा अनिवासी ग्रामवासी म्हणून ते मी करू शकलो. मला एक प्रश्न नेहमीच मनाशी पडत असे. माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाकडून जर आपलं गाव आणि शेजारच्या गावासाठी काम घडू शकतं तर माझ्यापेक्षा अधिक संपन्न झालेल्या हजारो–लाखो नागरिकांनी आपापल्या गावासाठी विचार केला तर कोणतेही गाव प्रगतीपासून दूर राहू शकत नाही; पण असं मोठ्या प्रमाणात घडत नाही, हे वास्तव आहे, त्यामुळेच खेडी दिवसेंदिवस ओस पडत चालली आहेत. या सर्व समृद्ध झालेल्या अनिवासी, ग्राम वासींना साद माणुसकीची फाउंडेशनतर्फे कळकळीची विनंती आहे की, त्यांनी फूल ना फुलाची पाकळी आपापल्या मूळ गावच्या ग्रामविकासात हातभार लावावा. आपणास त्यासाठी म ार्गदर्शनाची गरज लागल्यास 'साद माणुसकीची फाउंडेशन' यथायोग्य मार्गदर्शन करण्यासाठी कटिबद्ध आहे.

**१६. कृतिशीलता कशी जपत आहात?**

'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' असे म्हणतात. मात्र बरेचदा समाजकार्यासाठी

स्वतःच्या खिशात हात घातला जात नाही. सुरुवातीला स्वतःच्या संपत्तीतील महत्त्वपूर्ण हिस्सा ग्रामविकासाच्या पायाभरणीसाठी उभा केला. पुण्यात आमच्या मालकीची सिंहगड रोडवरील सन सिटी येथील २ बीएचके सदनिका राज्यभरातून येणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना राहण्यासाठी तात्पुरता निवारा म्हणून मागील ३ वर्षांपासून उपलब्ध करून दिलेली आहे. आजपर्यंत अनेकांनी या निवाऱ्याचा लाभ घेतला असून त्यासाठी त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे चार्जेस आकारले जात नाहीत. उलटपक्षी तेथील वीजबिल आणि देखभाल निधी आम्ही स्वत:च भरत असतो. वास्तविक पाहता तिथे राहून गेलेल्यांनी अनेकांना या निवाऱ्याचा लाभ व्हावा या संदर्भात माहिती पसरवण्याचं काम करायला हवं होतं. मात्र, म्हणावं त्या प्रमाणात या उपलब्धतेची माहिती इतरांना दिली नाही. पुण्यामध्ये जवळपास दोन ते तीन लाख विद्यार्थी विविध प्रकारच्या शिक्षणासाठी येत असतात. त्यांच्यासाठी निवाऱ्याचा प्रश्न हा फार मोठा आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यातील होस्टेलचे दर परवडत नाहीत. अशा वेळी ज्यांनी केवळ गुंतवणूक म्हणून फ्लॅट्स घेतलेले आहेत आणि केवळ कुलूप लावून ठेवलेले आहेत अशा सर्वांना माझी नम्र विनंती आहे की त्यांनी अगदीच मोफत नव्हे तरी निदान वीजबिल आणि देखभाल खर्च घेऊन अशा विद्यार्थ्यांना ते उपलब्ध केले तर संपत्तीसहयोगाचं समाधान ते याची डोळा याची देही घेऊ शकतील.

**१७. ग्रामविकासाचा विचार कसा सुचला?**

– भारत हा खेड्यांचा देश आहे. आपल्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न हे आजही खेड्यांमधून येते. महात्मा गांधींनी 'खेड्यांकडे चला' असे आवाहन केले खरे मात्र गेल्या काही वर्षांमध्ये शहरीकरण झपाट्याने झाले आणि खेड्यांचा विकास आक्रसत गेला. शहरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी, शिक्षण, उच्च शिक्षणाच्या सोयी–सुविधा, पाश्चात्त्य विचारांची भुरळ, आधुनिकता, झगमगाट या सर्वांच्या मोहामुळं खेड्यातून शहरांकडे होणारे विस्थापन वाढले आणि खेडी ओस पडू लागली. शासनाने ग्रामविकासाच्या अनेक योजना राबवल्या; पण त्यातून खेड्यांचा कायापालट झाला नाही. दुसरीकडे खेड्यांतून शहरांत गेलेला गावकरीही तिथल्या जगण्याच्या संघर्षात रमला आणि गावच्या मातीशी त्याची नाळ तुटू लागली. या सर्वांमुळे खेड्यांची स्थिती बिकट होत गेली.

खरे म्हणजे देशाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर ग्रामविकास अपरिहार्य आहे. केवळ विकासासाठीच नव्हे तर संस्कृती जपण्यासाठीही खेडी आवश्यक आहेत. आज मानवतेची मूल्ये गावगाड्यामध्येच अधिक प्रमाणात रुजलेली आहेत. ती वर्षानुवर्षांपासून कायम आहेत. जागतिकीकरणानंतरही गावगाडा तसाच सुरू आहे. मात्र विकास त्याच्या वेशीपल्याडच राहिला आहे. खेड्यांचा विकास करायचा असेल तर या गावागाड्यात राहणारा माणूस समजून घेणं आवश्यक आहे. त्यासाठी तिथं सोयी–सुविधा उपलब्ध होणं आवश्यक आहे. 'ग्रामविकास' हे एका रात्रीत साकार होणारं स्वप्न नाही, त्यासाठी अविरत आणि भगीरथ प्रयत्नांची गरज आहे. ते एकटा गावकरी, सरकार किंवा एखाद–दुसऱ्या सामाजिक संस्थेचंही काम नाही. सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था आपापला अजेंडा घेऊन ग्रामविकासाचे प्रकल्प राबवतात; मात्र अंतिमतः संपूर्ण ग्रामविकास ग्रामस्थांच्या सहभागाशिवाय साधला जाऊ शकत नाही. 'ग्रामविकास' हा इतर भौतिक सोयी–सुविधांबरोबरच वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाला महत्त्व देऊन गावकऱ्यांशी स्नेहबंध प्रस्थापित करून, बालक–युवक–महिला–ज्येष्ठ नागरिक–ग्रामस्थ यांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊन गावाच्या विकासाचा विचार मोठ्या पडद्यावर आणता येणे शक्य होऊ शकते. हा समग्र ग्रामविकासाचा विचार कृतीत उतरवण्यासाठी 'साद माणुसकीची फाउंडेशन' ही संस्था कार्यरत आहे.


सिंहगड रोड, सनसिटी येथील सदनिका सामाजिक कार्यकर्त्यांसाठी तात्पुरता निवारा म्हणून उपलब्ध.

**१८. त्याबाबतची वाटचाल कशी झाली?**

– या संस्थेची स्थापना २०१६ मध्ये झाली. कंपनी कायद्याअंतर्गत सेक्शन ८ कंपनीची स्थापना केलेली आहे. मेळघाटामध्ये स्वतःच्या गरजा अत्यंत कमी ठेवून आदिवासींच्या आरोग्यसेवेसाठी स्वतःचे आयुष्य खर्ची घालणारे महापालक डॉ. रवींद्र कोल्हे या फाउंडेशनच्या संचालक मंडळावर आहेत; तर ज्येष्ठ विचारवंत आणि बांधकाम व्यावसायिक श्री. ईश्वरलाल परमार हे प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत आहेत. तसेच फाउंडेशनच्या

व्यासपीठावर मार्गदर्शक म्हणून हिवरेबाजार आदर्श गावचे सरपंच व राज्याच्या आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष श्री. पोपटराव पवार, आपल्या मूळ निढळ या गावी ग्रामविकासाचे मॉडेल उभे करणारे पुण्याचे माजी विभागीय आयुक्त श्री. चंद्रकांत दळवी, कृषीरत्न श्री. आनंद कोठाडिया, श्री. सचिन ईटकर, 'स्नेहालया'चे गिरीश कुलकर्णी, रुरल रिलेशनचे श्री. प्रदीप लोखंडे, 'लातूर पॅटर्न'चे जनक माजी प्राचार्य अनिरुद्ध जाधव तसेच नियामक मंडळावर डॉ. सतीश देसाई, अ‍ॅड. उदय वारुंजीकर, श्री. यजुर्वेंद्र महाजन ही आपापल्या क्षेत्रातील दिग्गज मंडळी कार्यरत असून, कार्यकारी मंडळामध्ये राज्यातील विविध भागातील आपापल्या क्षेत्रातील नामवंत व तज्ज्ञ व्यक्ती ग्रामविकासासाठी कटिबद्ध आहेत.

अनिवासी गावकरी, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांत वेगवेगळ्या समस्यांवर कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्था आणि शासन यांच्या सहभागातून समग्र आणि संपन्न ग्रामविकासाचे मॉडेल राबवण्याचा या संस्थेचा प्रयत्न आहे. या संस्थेची साद आहे ती प्रामुख्याने गावातून शहराकडे गेलेल्यांना. आज परदेशात स्थायिक झालेले भारतीय वंशाचे नागरिक देशाच्या विकासासाठी हातभार लावत आहेत. मग गावखेड्यांमधून बाहेर पडून समृद्ध झालेल्यांनी आपल्या मूळ गावाच्या विकासासाठी सहयोग द्यायला नको का? खरे तर ते त्यांचे नैतिक कर्तव्य आहे. या कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांना सोबत घेऊन, मार्गदर्शन करून 'साद माणुसकीची फाउंडेशन' काम करत आहे.

**१९. ग्रामविकासाची पंचसूत्री नेमकी काय?**

– शिक्षण : शिक्षण हा कोणत्याही विकासाचा पाया मानला गेला आहे म्हणूनच खेड्यांचा विकास साधायचा असेल तर ग्रामीण शैक्षणिक विकास साध्य करणे अत्यंत गरजेचे आहे.

आरोग्य : बदलत्या जीवनशैलीमुळे नागरिकांत निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या समजून घेऊन त्या समस्यांवर मूलभूत व सहज परवडणाऱ्या उपाययोजना ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे.

शेती : भारतातील बहुतांश ग्रामीण समाज शेती व शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. हा समाज आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व संपन्न होईल, यासाठी संघटित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

रोजगार व कौशल्यविकास : ग्रामीण भागातील युवकांमध्ये लपलेल्या विविध कौशल्यांना वैशिष्ट्यपूर्ण आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विकसित करण्यासाठी विविध संस्थांच्या सहयोगाने कौशल्यविकास कार्यक्रम राबवणे व या युवकांना स्वाभिमानाने उपजीविकेची खात्री देणारे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

वृद्धसेवा : बदलती परिवार पद्धती व समाजरचना यातून वयोवृद्ध व्यक्तींच्या वेगळ्याच समस्या आज निर्माण होत आहेत. भविष्यात त्या अजून जटिल स्वरूप धारण करतील. या समस्यांवर वेळीच अभिनव उपाययोजना तयार करून ज्येष्ठ व वृद्ध व्यक्तींना समाजात उन्नत व सन्मानाचे स्थान निर्माण करून देणे.

**२०. संपत्तीसहयोग ते संपत्तीदान, जगा आणि जागा, नेमके काय आहे?**

– माझ्या कामाच्या पद्धतीप्रमाणे आधी स्वतः करायचे आणि त्यानंतरच इतरांना सांगायचे. 'संपत्तीसहयोग ते संपत्तीदान' या संकल्पनेची सुरुवात 'तुम्ही–आम्ही पालक' या आमच्या मासिकाला समाजाला समर्पित करून केलेली आहे.

## अभिप्राय




माननीय संपादक,
तुम्ही–आम्ही पालक,
श्री. हरीश बुटले
यांना स.न.

'महापालक पुरस्कारा'चा समारंभ अत्यंत भव्य, नेटका झाला. त्या मागचे आपले नियोजन, तळमळ अनुरूप होती. आजपर्यंतचे सर्व पुरस्कार अतिशय योग्य व्यक्तींना दिले गेले. डॉ. राजेंद्रसिंहजींना दिल्या गेलेल्या या वेळच्या पुरस्काराने तर राष्ट्रीय उंची गाठलीय, आपल्या महान कार्याची प्रचिती आली.

आपण दिलेले 'तुम्ही–आम्ही पालक'चे बहुतेक सर्व अंक मी वाचले. काही कॉलेजेस व संस्थांना त्यातील काही अंक भेट देतेय. प्रत्येक अंकातील आपली संपादकीय भूमिका आवर्जून वाचते. त्यातील विद्यार्थी, समाजासाठीचा संदेश महत्त्वपूर्ण आहे.

प्रत्येक अंक दर्जेदार आहे. त्यातील मान्यवर व अनुभवी समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ वगैरेंचे लेख, व्यक्तीदर्शन, काही संस्थांचा परिचय वाचून मला नवे क्षेत्र, नवे कार्य, नवे जग पाहिल्याची जाणीव होते. खरंच तुम्ही विद्यार्थ्यांचे, समाजाचे महापालक आहात. आपल्या व डॉ.सौ. रोहिणीताईंच्या कार्याला मनःपूर्वक धन्यवाद..!

चंद्रपूरजवळच्या कोठारी गावापासून मुंबई–पुणेपर्यंतचा आपला जिद्दीचा जीवनप्रवास, ध्येय साध्य करणारा व ज्ञान, अनुभव, शिक्षणाचे महादान समाजाला अर्पण करणारा आहे, परिवर्तनीय आहे, मनःपूर्वक धन्यवाद..!

आपली,



**सुरेखा शहा**
चंद्ररेखा, प्रभाकर महाराज मार्ग, सम्राट चौक,
४३/११, बुधवार पेठ,
सोलापूर ४१३ ००२
फोन : ०२१७ – २३२६३७७
मो. ९४०४३०१३७३




हे मासिक सुजाण पालकत्व, शिक्षण आणि सामाजिक कारणासाठी असून, त्यात अजून तरी कोणतीही जाहिरात स्वीकारली जात नाही. या मासिकाच्या निर्मितीचा खर्च वगळता नवा पैसा आम्ही संस्थेसाठी किंवा वैयक्तिक वापरत नाही. त्याचप्रमाणे गरजेपेक्षा जास्त असलेल्या बाबींचा सहयोग करण्यासाठी मी माझा पुण्यातील फ्लॅट ज्याची बाजारातील किंमत किमान ७० लाख असेल तो संपत्तीसहयोगातून सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी तात्पुरता निवारा म्हणून उपलब्ध करून दिलेला आहे. त्याचप्रमाणे 'जगा आणि जागा' 'समृद्धीतून सहयोग' या संकल्पनेची माझ्या मूळ गावाला कोठारीला ५ लाखांची मदत पुढील पाच वर्षांत दरवर्षी १ लाख याप्रमाणे देण्याचे योजले आहे आणि त्याची सुरुवातही केलेली आहे.

आपल्या संततीबाबत आमची भूमिका फार स्पष्ट आहे. मुलं कमावती झाल्यावर त्यांना आमच्याकडे असलेल्या संपत्तीचा कोणताही वाटा मिळणार नसून, त्यानंतर संपत्तीचा विनियोग गरजूंसाठी करण्याचे आम्ही ठरवले आहे. त्यासाठी २०२५ मध्ये आम्ही आमच्या नेहमीच्या कामातून बाजूला होऊन पूर्णवेळ ज्या ठिकाणी आरोग्य व शिक्षणाच्या समस्या असतील तेथे जाऊन ग्रामविकासाच्या दृष्टीने कार्य करण्याचे निश्चित केले आहे.

**२१. आणखी कोणते उपक्रम आपण करत आहात?**

महापालक सन्मान : 'सर फाउंडेशन' या ट्रस्टतर्फे असामान्य पालकत्वासाठीचा 'महापालक सन्मान' दरवर्षी प्रदान करण्यात येतो.

महाएक्झाम : डीपर प्रमाणे ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी महाएक्झाम सराव परीक्षेचे आयोजन करण्यात येते.

सेतूबंध : साद माणुसकीची सामाजिकता अभियानाअंतर्गत सामाजिक संस्थांना आणि समाजकार्य करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्यांना एकत्र घेऊन 'सेतूबंध' उभारण्याचे सुरू केले आहे. सामाजिक संस्थांच्या संसाधन विकासासाठी मदत करणे, त्यांना अनुभवी व निष्णात व्यक्तींकडून वैधानिक व कायदेशीर बाबींवर मार्गदर्शन करणे आदी कार्ये या अभियानाअंतर्गत पार पाडण्यात येणार आहेत.

माणुसकी सन्मान : समाजात माणुसकीचे अत्युच्च मापदंड निर्माण करणाऱ्यांसाठी फाउंडेशनतर्फे 'माणुसकी सन्मान' सुरू करण्यात येत आहे.

सारांशाने सांगायचे झाल्यास ग्रामीण विकासाच्या आजच्या वास्तवाची समीक्षा करून त्यानुसार या संस्थेने एक सर्वंकष आराखडा तयार केला आहे, त्याला लोकसहभागाची साथ आवश्यक आहे. आज शासकीय योजना, आराखडे, धोरणे या माध्यमातून गावांपर्यंत विकासाची गंगा कशी, किती आणि कधी पोहोचली आहे, हे आपण पाहत आहोतच, त्यामुळे लोकसहभाग आणि जनतेचा पुढाकार याशिवाय ग्रामविकासाचे स्वप्न साकार होणार नाही. या स्वप्नपूर्तीसाठी साद माणुसकीची फाउंडेशनने दिलेल्या हाकेला सकारात्मक आणि सक्रिय प्रतिसाद दिल्यास ग्रामविकासाची सोनेरी पहाट दूर नाही.

**२२. आपल्या हातून प्रत्येक काम उत्कृष्टच होते. कामाची नेमकी पद्धत काय?**

– माझी काम करण्याची पद्धत थोडी निराळी आहे. जे काम करायचं आहे, त्या क्षेत्रात पूर्वी काय घडलं आहे, त्याचा इतिहास काय, सरकार दफ्तरी काय आहे, या विषयावर मी फारसं लक्ष देत नाही. आपल्या विवेकबुद्धीने सारासार मांडणी करताना कोणतीही पूर्वग्रहदूषित भूमिका नको, हे त्यामागचे कारण. मात्र, एकदाची मांडणी झाली की, ती अस्तित्वात असलेल्या धोरणांशी कितपत जुळते ते पडताळून पाहायचं आणि गरज भासल्यास त्यात काही सुधारणा करायची झाल्यास ती करायची. आपल्या सारासार विचारसरणीला पटेल आणि सर्वसामान्य माणूस त्या गोष्टीकडे कसा बघेल? हा विचार करून ती मांडणी असल्याने आजपर्यंतची माझी कामं एक वेगळी छाप सोडून गेलेली आहेत. मग ते कोचिंग क्लासेसच्या क्षेत्रातील 'फ्रँचाईसी'ची आद्य कल्पना असो, 'डीपर'च्या परीक्षांचं यश असो की, संपादनाचा कोणताही अनुभव नसताना सुरू केलेलं 'तुम्ही–आम्ही

पालक' मासिक असो. वरील तिन्ही बाबींनी आपल्या क्षेत्रात एक वेगळं स्थान निर्माण केललं आहे. त्याची अनुभूती आपणास हा अंक वाचताना येईलच. त्याच विचारधारेला अनुसरून ग्रामविकासाची पंचसूत्री मांडतानाची ध्येयं आणि उद्दिष्टे आहेत. गावाच्या विकासाच्या कल्पना करताना जे विचार रुंजी घालत होते, त्यात गावखेड्यात असलेले हेवेदावे आणि नानाविध भानगडी लक्षात येत होत्या. आपल्याला एक गाव म्हटलं की, लगेच बारा भानगडी आठवायला होतं. मात्र, त्याचं सकारात्मक स्वरूप साकारताना 'एक गाव-बारा उपक्रम' ही संकल्पना पुढे मांडली. कोणत्याही गावाचा विकास साधायचा म्हटलं तर तुकड्या-तुकड्यांत काम करून भागायचं नाही. एका समस्येवर काम करताना दुसरी समस्या तशीच राहता कामा नये. थोडक्यात, ज्याप्रमाणे आपल्या शरीरातील प्रत्येक अवयव योग्य रीतीने कार्यरत राहिला तर शरीर आणि मन सुदृढ राहतं तसंच ग्रामविकासाचं आहे. त्यातील एकही सूत्र मागे पडलं तर नियोजनबद्ध ग्रामविकास होऊच शकत नाही. शिवाय 'ग्रामविकास' हे काही कोण्या एकाचं काम नव्हे. ना सरकार ते एकट्याने करू शकतं की कोणती संस्था..! ग्रामविकासासाठी त्या गावात राहणाऱ्या सर्व आबालवृद्धांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असतो आणि सर्वांना आपल्या गावाच्या विकासासाठी एकाच दिशेने कार्य करण्यासाठी आणि ते करून घेण्यासाठी निःस्वार्थी असं प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व लागतं आणि आजच्या या धकाधकीच्या जीवनात अशी माणसं फार कमी आहेत.

**२३. महापालकांकडून मिळालेली शिकवण...**

- 'तुम्ही-आम्ही पालक' मासिकामुळे माझ्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ होत गेल्या. २०१३ मध्ये महापालक सन्मानाच्या निमित्ताने सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांचा सहवास लाभला. डॉ. प्रकाश आमटे काका आणि डॉ. मंदा काकूंच्या एका तपानंतरच्या हेमलकसा येथील भेटीने माझ्या मनाच्या कोपऱ्यातील सामाजिक जाणिवेला एक सकारात्मक आणि विधायक वळण मिळालं. पुढील २-३ वर्षांत मी सामाजिक क्षेत्राकडे खूपच विचारपूर्वक बघू लागलो आणि मनस्वी चिंतन करू लागलो. त्याच दरम्यान डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिताताई यांच्याकडे बैरागडला जाण्याचे भाग्य मिळाले. त्यांच्या सहवासात समर्पणाची परिसीमा काय असू शकते आणि साधेपणा व गरजेपुरते काय आणि कसे असावे याची शिकवण मिळाली. त्यांनाही माझे काम खूप भावले. आता तर रवीदादा 'साद माणुसकीची' फाउंडेशनचे संचालक आहेत.

डॉ. कुमार सप्तर्षी आणि डॉ. ऊर्मिला दीदींकडूनही खूप स्नेह मिळाला. डॉक्टरांजवळ विचारांची आणि त्यांच्या अनुभवाची काहीच कमी नाही. ते म्हणजे ज्ञानाचं समृद्ध भांडारच होय. अरळीकर दाम्पत्यांनी आंतरजातीय विवाहांसाठी केलेले काम एक वेगळाच दृष्टीकोन देतो. डॉ. राजाभाऊ आणि रेणूताई दांडेकरांकडून तर काय शिकू आणि काय नाही असे होत असते. डॉ. राजाभाऊंचे व्यवस्थापन कौशल्य आणि शिक्षणात खोलवर रुजलेलं रेणूताईंचं काम दीपस्तंभासारखेच आहे. नुकताच महापालक सन्मान राष्ट्रीय पातळीवर जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंहांना व मीना सिंहजी यांना प्रदान करण्यात आला. भारताच्या सामाजिक क्षेत्रातील सर्वात अजोड असं पाण्याचं काम त्यांनी राजस्थानात आणि टप्प्याने संपूर्ण भारतभर उभं केलं त्यांनी त्यागाची आणि समर्पणाची अत्युच्च अशी सीमा ओलांडली आहे अशा या जोडप्यांचा सहवास आणि आशिर्वाद माझ्यासाठी अनमोल आहे. या सर्व महापालकांना आमच्या जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे.

या दरम्यानच सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, त्यांची काम करण्याची पद्धत या साऱ्याच बाबी जवळून बघता आल्या आणि समजूनही घेता आल्या. विविध ग्रुप्स, त्यावरील चर्चा, वास्तववादी कामं



आई-वडिलांचा लग्नाचा पन्नासावा वाढदिवस कोठारी येथे

आणि आभासी कामं याचा अंदाजही येऊ लागला. त्यातूनच काहीतरी भरीव करू शकू, या संदर्भात विचार सुरू झाले आणि 'साद माणुसकी'ची सामाजिकता अभियानाची मुहूर्तमेढ रोवली.

**२४. तुम्ही प्रत्येक काम हाती घेताना महाराष्ट्र हेच कार्यक्षेत्र मानले आहे...**

- आमच्या या वाटचालीत आमच्या कुटुंबातील सर्व सदस्यांची, जिवाभावाच्या मित्रांची साथ मोलाची ठरली. माझ्या कामात काही जणांनी तर फारच मोलाचे सहकार्य केले. माझ्या प्रत्येक कामाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राहिलं आहे, त्यामुळे कामाला सुरुवात करताना माझ्या धडपडीला बघून पुढाकाराला कोणी ना कोणी पुढे आले आणि त्यातून ही वाटचाल सुकर होत गेली. या प्रत्येकाचे आम्ही कायमस्वरूपी ऋणी आहोत. आपल्या संकल्पनेचा लाभ महाराष्ट्रातील सर्व स्तरात व्हावा या उद्देशानेच आमचे सर्व प्रकल्प महाराष्ट्र व्यापी राहिले आहेत.

माझ्या मते, चांगल्या वृत्तीचे शिक्षकच उत्तम पिढी घडवू शकतात, त्यामुळे शिक्षकांना समृद्ध कसे करता येईल, त्यासाठी माझा विशेष प्रयत्न सुरू आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकाने समृद्ध झाल्यानंतर आपल्या मूळ गावाकडे वळून बघितलं आणि आपल्या समृद्धीतून सहयोग केला तर गावोगावच्या शिक्षण, आरोग्याच्या, रोजगाराच्या, वृद्धांच्या समस्या दूर




होण्यास वेळ लागणार नाही. मात्र, बहुतांशी लोकं आपल्या गावासाठी म्हणावा तसा सहयोग देत नाहीत, त्यासाठी कारणेही अनेक आहेत. ही स्थिती जाणून आता 'जगा आणि जागा : समृद्धीतून सहयोग' या अभियानातून जागरण करायचे ठरविले आहे.

**२५. सहजीवनाची सुरुवात, प्रवास आणि वाटचाल थक्क करणारी आहे...**

– ७ डिसेंबर हा दिवस माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचा. रोहिणी आणि माझ्या सहजीवनाचा २१ वर्षांचा कालखंड डोळ्यांसमोरून फ्लॅशबॅकच्या स्वरूपात तरळताना तो टप्पा कसा गाठला गेला काही कळलेच नाही. सततच्या कार्यमग्नतेत २२ वर्षांतील ७,६६५ दिवसांचा सुख-दुःखाचा प्रवास आयुष्याच्या या सातबाऱ्यावर काही ना काही आनंदाच्या खुणा कोरून गेला.

श्रद्धा क्लासेस, श्रद्धा पब्लिकेशन, डीपर, सर फाउंडेशन, तुम्ही-आम्ही पालक मासिक, साद माणुसकीची... ही वाटचाल मागील २१ वर्षांची साक्ष आहे. लग्नापूर्वीची श्रद्धा कलासेस आणि पब्लिकेशन ही जीवनातील चढ-उताराची आणि स्थैर्याची तर मागील १०-१२ वर्षांची 'डीपर'पासून सुरू झालेली सामाजिकतेची वाटचाल जीवनाला एक वेगळा आयाम देऊन गेली. या दरम्यान जे सामाजिक भान निर्माण झालं आहे, त्याची परिणती आज 'साद माणुसकी'च्या सामाजिक अभियानात झाली.

या २१ वर्षांतील प्रवासात मिळालेली रोहिणीची साथ खरंच उल्लेखनीय आहे. सुरुवातीच्या काही दिवसांत माझे सामाजिक भान तिला झेपत नव्हते; पण 'डीपर'च्या सुरुवातीनंतर पुढे 'सर फाउंडेशन'च्या माध्यमातून सुरू झालेला महापालक सन्मान, तुम्ही-आम्ही पालक मासिक आणि त्यातून उभं राहिलेलं 'साद माणुसकीची' सामाजिक अभियान जसं-जसं पुढं आलं, तशी तिची सामाजिक जाणीव दिवसेंदिवस प्रगल्भ होत गेली, त्यामुळेच मला एकाच वेळी अनेक आघाड्यांवर कार्यरत राहता आलं. तिने स्वतःची हॉस्पिटलमधील व्यस्त नोकरी सांभाळून आमच्या श्रद्धा आणि हर्ष दोघा मुलांना भरपूर वेळ देऊन ज्या पद्धतीने संगोपन केले, ते खरंच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे. या दरम्यान मुलांना सांभाळण्यासाठी अप्पा आणि कलाताई बुद्धीहाळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. आमची दोन्ही लहान मुलं या दोघांनी आपली नातवंडं म्हणून वाढवली. घरातून सपोर्ट मिळाला की माणूस काय करू शकतो, ते मी अनुभवलं आहे म्हणूनच मी माझ्यासमोर येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला तेवढेच समर्थपणे भिडत असतो आणि आमच्या कार्याला नवनवीन आयाम देत असतो. माझ्या या वाटचालीत डॉ. रोहिणीचा खूपच मोलाचा वाटा आहे. तिच्या सहकार्याने हा कालावधी कसा निघून गेला, ते कळलेही नाही.

**२६. जीवनाचे तत्त्वज्ञान काय?**

– माझ्या जीवनाचा महत्त्वाचा धर्म म्हणजे मूळ कधीही न विसरणे, ज्याचं श्रेय त्याला देणं आणि इतरांना काहीही सांगण्यापूर्वी स्वतः कृती करणे. जन्मदाते आई-वडील आणि माझे काका-काकूंपासून तर माझ्या जीवनात आलेले माझे प्रमुख शिक्षक आजही मला तेवढेच भावतात. त्यांच्या आठवणीशिवाय माझ्या जीवनातील कोणतीही महत्त्वाची गोष्ट पूर्ण होत नाही. सुजाण 'पालकत्व' हा काही आपल्या पाल्यापुरताच मर्यादित विषय नाही. आपला समाज, आपलं राष्ट्र यासाठीदेखील पालकत्वाची भूमिका पार पाडणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी त्याने आपल्या मूळ गावापासून त्याची सुरूवात करणे गरजेचे आहे. जे कधीच खेड्यात राहिले नाहीत, त्यांनी आपल्या जिव्हाळ्याचं एखादं गाव निवडून तेथील समस्या दूर करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करणे आज काळाची गरज आहे.

**२७. एवढ्या व्यस्त दिनक्रमात घरात कुटुंबाला वेळ कसा देता?**

– ज्यावेळी मी घरी असतो त्यावेळी १०० टक्के कुटुंबाचाच असतो. माझी मुले आता मोठी झाली आहेत. मुलगी बारावी कॉमर्सला आहे. तिला सीए करायचे आहे आणि मुलगा दहावीत आहे. दोघांनाही लहानपणापासून त्यांची आई सदैव घरी असल्याप्रमाणेच होती. कारण ज्या वेळी मुले शाळेत जायची त्यानंतर डॉ. रोहिणी तिच्या हॉस्पिटल ड्युटीवर जायची आणि मुलं घरी यायच्या आत ती घरी परतायची. आईच्या तुलनेत त्यांना माझा सहवास कमी मिळाला तरी त्यांची कोणतीच तक्रार नसायची. मात्र, वर्षभरात मी किमान १०० ते १२० दिवस घराबाहेर असतो. मात्र मी सलग सात दिवसांपेक्षा जास्त बाहेर थांबत नाही. त्यामुळे मुलांना मी आठ दिवसानंतर हवा तसा वेळ देऊ शकतो. घरी असताना आम्ही एकमेकांचे मित्र असतो आणि खूप धमाल करतो.

**२८. कामाचा स्थायीभाव काय?**

– अतिशय नम्रपणे सांगतो की, जे करावे ते उत्तम आणि ज्यात हात घालू त्यात निष्ठेने आणि सचोटीने झोकून द्यायची वृत्ती असल्याने माझ्या प्रत्येक कामाला एक विशिष्ट उंची लाभली. त्या-त्या क्षेत्रातील ते उत्तम काम ठरले. 'डीपर'ने गुणवत्तेचे सारे आयाम सर केले. आज महाराष्ट्रात 'डीपर'सारखी दुसरी परीक्षा नाही आणि प्रयत्न करूनही तिच्या आसपास कोणी पोहोचू शकलं नाही. १२ वर्षांत नऊ वेळा 'डीपर'ची परीक्षा देणारे विद्यार्थी राज्यात पहिले आणि त्यात तीन वेळा वैद्यकीय आणि इंजिनिअरिंग दोन्हीसाठी हे स्वप्नवत वाटतं; पण वास्तवात उतरले आहे.




पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त कुटुंबासह केक कापताना. सोबत परमार सर.

१०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेने चइइड ची कवाडं उघडण्यासाठी आत्मविश्वास दिला. खरं तर मलाच डॉक्टर होण्याची मोठी इच्छा होती, मात्र माझ्या जबाबदाऱ्या मला खुणावत होत्या, त्यामुळे मला सीओईपीला इंजिनिअरिंगला जावं लागलं. अर्थात, डॉ. रोहिणीच्या माझ्या आयुष्यात येण्याने ती पोकळी भरून निघाली. तुम्ही आम्ही पालक हे उत्तम मासिक आणि साद माणुसकीची ही संकल्पना सर्वसमावेशक अशी आहे.

**२९. माध्यमांच्या सामाजिक बांधिलकीविषयी काय सांगाल?**

– काही सन्माननीय अपवाद वगळता नवखे तरुण कार्यकर्ते सामाजिक क्षेत्रात आल्यावर मानसन्मान, पुरस्कार आणि प्रसिद्धीसाठी फारच हपापलेले आहेत की काय, असे चित्र दिसू लागले आहे. माझ्या माहितीतील एक कार्यकर्ता. त्याला जेमतेम वर्षही झालं नसेल त्यावेळी या क्षेत्रात मात्र, प्रमुख सर्व वर्तमानपत्रात त्याच्या कार्याची महती एवढी झळकली की, कोणालाही वाटावं की याने किती वर्षाचं काम केलेलं आहे असे नवखे कार्यकर्ते 'बावनकशी' कसे बनतात? याचेही अप्रुप वाटते. त्याच वृत्तपत्रात जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांच्यासारख्या समाजसेवेतील दिग्गजांना महापालक सन्मान प्रदान केल्यानंतरची साधी बातमीही नसते. अशा रितीने विश्वासार्ह माध्यमांनीदेखील सामाजिक क्षेत्रात आभासी चित्र निर्माण करण्यात मोठी भूमिका बजावत आहेत. त्यामुळे वास्तववादी आणि अनेक वर्षांपासून निरलस काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा या माध्यमांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. माध्यमांनी खरं तर वास्तव समाजापुढे मांडले पाहिजे, त्यांनीच जर आभास निर्माण केला तर सर्वसामान्य जनता दिशाभूलीची बळी पडणारच. त्यामुळेच विशेष कष्ट न करता 'चमकोगिरी' करणाऱ्या कार्यकर्त्यांचे फावते.

डीपरचा आम्ही १२ वर्षाचा यशस्वी टप्पा गाठूनही आजपर्यंत कोणत्याही माध्यमाने विशेष दखल घेतलेली नाही, 'मात्र छएएढ/चक्ढ–उएढ विषयक काहीही गोंधळ झाला की मात्र, आवर्जून त्यांना आमची आठवण होते. त्यामुळे तुमचं कामच असं असावं की त्याची दखल घ्यायला भाग पडलं पाहिजे. आमच्या संपूर्ण वाटचालीची कल्पना राज्यव्यापी एका मोठ्या दैनिकाच्या मुख्य संपादकांना दिली आणि सांगितलं की आजवर या प्रक्रियेची फारशी दखल घेतलेली नाही त्यावर ते म्हणाले की, 'हरीश, अशा कामांची दखल न घेणे हीच मोठी बातमी आहे' मात्र, या गोष्टीला आता वर्ष सरून गेले तरी त्याही वृत्तपत्राने अजून आमच्या कार्याविषयी काही मांडलेलं नाही. यावरून माध्यमं आपल्याच विश्वात किती रमलेले आहेत ते कळते आणि त्यामुळेच आभासी चित्र निर्माण करणाऱ्यांचे फावते, हेदेखील तेवढेच खरे.

**३०. आयुष्याचा पुढील प्रवास कसा असेल?**

– आजपर्यंतच्या वाटचालीत सामाजिक क्षेत्रात जेवढं काम करणं शक्य झालं, ते स्वावलंबनातूनच केलं. बाहेरील देणगी किंवा कोणतेही सरकारी अनुदान अपेक्षित धरलं नाही. मात्र, आता 'साद माणुसकीची फाउंडेशन'साठी पहिला मोठा तब्बल २० लाख रुपयांचा सहयोग विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्टकडून मिळाला आहे. ही सर्व रक्कम माझे मूळ गाव कोठारीच्या शेजारील १० शाळांच्या सुविधांसाठी वापरण्यात आली आहे. 'साद माणुसकीची फाउंडेशन' हे पुढील ३ ते ५ वर्षांत या महाराष्ट्रातील एक आघाडीची सामाजिक संस्था जी केवळ इतरांसाठी काम करणारी संस्था म्हणून प्रस्थापित होईल यात मला तीळमात्र शंका नाही. या सर्व वाटचालीत मला माझ्या मुलांचे खूपच कौतुक आहे. त्यांच्या जाणिवा फार प्रगल्भ आहेत. त्यांना कल्पना आहे की, ते कर्ते झाल्यानंतर आमच्या संपत्तीत त्यांना वाटा नाही. जे काही शेवटी शिल्लक राहील ते समाजासाठी आहे.

आम्ही दोघेही २०२५ ला आमच्या कामातून विराम घेऊन आमच्या आनंदासाठी, ज्या ठिकाणी आम्हाला योगदान देता येईल अशा ठिकाणी वास्तव्यास जाणार आहोत. आमच्या संस्थांचे त्यानंतर केवळ चशपीी म्हणून काम पाहू. २५ डिसेंबर २०१४ महामानव बाबा आमटे यांच्या शताब्दी महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'सामाजिक पालकत्व' विशेषांकात आमच्या पुढील सामाजिक जीवनातील वाटचालीसाठी आम्ही वचनबद्ध झालोत आणि अगदी त्याप्रमाणेच आम्ही आमची वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपल्या सदिच्छा कायम पाठीशी राहो हीच आशा ठेवत आम्ही साद देत आहोत, आपल्या प्रतिसादाच्या प्रतिक्षेत...धन्यवाद !

# क्षणचित्रे


















# क्षणचित्रे




















